# लघुवाद न्यायालय, मुंबई

( श्री. व्यं. पोतदार यांचे समोर )

## आर.ए.ई.ॲण्ड आर.दावा क्र. 690/1101/2013

1. कावासजी दिनशॉ ट्रस्ट आणि इतर .... वादी

**वि रु ध्द**

1. महाराष्ट्र शासन आणि इतर .... प्रतिवादी

कोरम : श्री. व्यं. पोतदार, न्यायाधीश,
न्या. क्र. 6, मुंबई.
तारीख : 03.02.2014

वादीचे वकील : ॲड. कु. जे. पी. ठक्कर
प्रतिवादींचे वकील : ॲड. डी. जे. वालावलकर

## निशाणी 17 च्या अर्जावर आदेश

1. प्रतिवादी क्र. 1, 2, 4 आणि 5 हयांनी मिळून हा अर्ज, 'त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करावा', हयासाठी दिला आहे. त्यांचे थोडक्यात कथन असे की, ता. 28.08.2013 ला त्यांना दाव्याची समज मिळाली. तथापि, आमचे वकील शस्त्रक्रियेमुळे इस्पितळात होते. त्यामुळे, कैफियत वेळेत देता आली नाही. तरी, झालेला विलंब माफ करुन ती स्विकारावी, हयासाठी हा अर्ज आहे.

2. हया अर्जाला वादींनी आपले लेखी म्हणणे नि. 18 ला दिला आहे. त्यात त्यांचे कथन असे की, हा अर्ज मंजूर करण्यास कोणतेही सबळ आणि पुरेसे कारण नसल्याने तो फेटाळावा.

3. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. न्यायाच्या दृष्टीने एक संधी देण्यासाठी खालील अटीवर हा अर्ज मंजूर केला आहे.

## आ दे श

प्रत्येक अर्जदाराने रु. 125/– हया दराने एकूण रु. 500/– 'कॉस्ट' वादींना द्यावी. मगच, त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन ती स्विकारण्यात येईल.

मुंबई
ता. 03.02.2014

( श्री. व्यं. पोतदार )
6वे लघुवाद न्यायाधीश, मुंबई

CR6/svp/Jts/Feb 14/17-Exh-690-1101-2013-RAE&R-odt ssb/-

www.ecourtsindia.com

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHSCA20017562013/truecopy/order-1.pdf